<u>प्रेसनोट दिनांक ०१/०४/२०२३</u>

# सराईत वाहनचोरासह स्क्रॅप व्यावसायीकांना अटक करुन, दुचाकी वाहन चोरीचे ११ गुन्हे उघडकीस.

## खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा यांची कामगिरी

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील चैन स्नॅचिंग, वाहन चोरी, मोबाईल चोरी, घरफोडीचे गुन्हयास प्रतिबंध व्हावा व गुन्हे उघडकीस आणावेत याबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सुचना प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे, खंडणी विरोधी पथकाकडील स्टाफमार्फत उघडकीस न आलले वाहन चोरी गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना, पोहवा रमेश मावसकर, पोहवा प्रदीप गोडांबे यांना मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरुन, मधुकर पवळे शाळे समोर, ओटा स्किम निगडी पुणे याठिकाणी सापळा लावुन, पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार सुधीर उर्फ लखन मधुकर कांबळे वय ३३ वर्षे रा. यशोदा बिल्डींग पाचवा मजला रुम नंबर ५१३, अंजठानगर चिंचवड पुणे यास ताब्यात घेवुन, त्याचेकडे विचारपुस करता, त्याने **निगडी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १४/२०२३ भादवि कलम ३७९ प्रमाणे** गुन्हा दाखल गुन्हयातील दुचाकी वाहन तसेच पिंपरी चिंचवड शहरातल आणखी दुचाकी वाहने चोरी केल्याचे सांगितलेने त्यास सदर गुन्हयात दि.२७/०३/२०२३ रोजी अटक करुन, त्याची ०५ दिवस पोलीस कस्टडी घेवुन,कस्टडी दरम्यान तपास करुन त्याचेकडुन **४,६५,०००/- रुपये किंमतीचे** निगडी पो.स्टे.कडील - ०२ गुन्हे, चिखली पो.स्टे.कडील - ०३ गुन्हे, चिंचवड पो.स्टे.कडील ०३ गुन्हे, दिघी पो.स्टे.कडील - ०२ गुन्हे व सांगवी पो.स्टे.कडील - ०१ असे एकुण **११ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन, त्यापैकी २,९०,०००/- किंमतीच्या ०७ दुचाकी वाहने हस्तगत करुन, ०५ दुचाकी वाहने स्क्रॅप करणारे आरोपी १) रशीद मन्सुद शेख वय ३४ वर्षे रा.दुर्गानगर झोपडपट्टी, समाधान फुट वेयर जवळ, निगडी, पुणे २) अन्वर शफी शेख वय ४३ वर्षे रा.मिलींदनगर संजय हॉटेलचे समोर, बुध्दविहारामागे, निगडी, पुणे तसेच ०२ दुचाकी वाहने घेणारा आरोपी नामे मयुर सुखदेव हराळ वय ३४ वर्षे रा. सी-पत्राशेड, अजंठानगर, चिंचवड, पुणे, मुळगाव मुपो. जातेगाव, ता. जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना अटक करण्यात आले आहे.** सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस उप-निरीक्षक अमर राऊत खंडणी विरोधी पथक हे करत आहेत.

**आरोपी सुधीर उर्फ लखन मधुकर कांबळे हा पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन, त्याचे विरुध्द जबरी चोरी, घरफोडी व वाहनचोरीचे असे एकुण १२ गुन्हे दाखल आहेत.**

**सदरची कारवाई मा. विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ.प्रशांत अमृतकर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, सहा.पो.उप-निरी.अशोक दुधवणे, अमर राऊत, पोलीस अंमलदार रमेश गायकवाड, सुनिल कानगुडे, निशांत काळे, रमेश मावसकर, किरण काटकर, प्रदीप गोडांबे, विजय नलगे, ज्ञानेश्वर कु-हाडे, आशिष बोटके, गणेश गिरीगोसावी, शैलेश मगर, सुधीर डोळस, प्रदीप गायकवाड, प्रदीप गुट्टे व तांत्रिक विश्लेषक पोहवा नागेश माळी यांचे पथकाने केली आहे.**

**(स्वप्ना गोरे)**
**पोलीस उप-आयुक्त,**
**गुन्हे, पिंपरी चिंचवड**

Scanned with CamScanner